पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १५

**सभावृत्तांत**

**दिनांक - १८/१०/२०२१** **दुपारी - २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची **पाक्षिक** सभा सोम**वार** दिनांक १८**/१०/२०२१** रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे) तसेच मा.कक्ष अधिकारी आपत्ती व्यवस्थापन प्रभाग,मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक/आव्यप्र/२०२०/प्र.क्र.२२५/आव्यप्र/१ दि.१७/०९/२०२१ अन्वये सभागृहातील आसन क्षमतेच्या ५०% प्रमाणे सदस्यांचे उपस्थितीत आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सरिका शिवाजी सस्ते
३. मा. बारसे प्रियांका प्रविण
४. मा.काटे स्वाती(माई) चंद्रकांत

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.संदिप खोत - उप आयुक्त व मा.रोहिणी शिंदे - कार्यालयीन अधिक्षक सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सनमा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विघ्यार्थ्यांना स्वाध्याय पुस्तिका व वहया वाटप करणे बाबत..
मा.प्रियांका बारसे व मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ,१ ली ते १० वी तील विदयार्थ्यांना स्पंदन म्युझिक ॲन्ड डान्स अकॅडमिक संस्थेमार्फत संगीत आणि नृत्य प्रक्षिशन देणे बाबत.
मा.सारिका सस्ते व मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व सर्व प्राथमिक शाळेतील इ१ ली ते इ. ८ वी तील विदयार्थ्यांसाठी पन्नालाल म्युझिक कंपनीच्या पुस्तकवाणी यांच्या मार्फत मनपाच्या प्रति शाळा डिजिटल लायब्ररीसाठी २०५ ऑडीओबुक्सचा खरेदी करण्याबाबत

मा. सारिका सस्ते मा.प्रियांका बारसे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) - सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षाकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विभागातील इयत्ता १ ली ते इ.१० वी च्या विद्यार्थीकरिता शालेय दफ्तरे खरेदी करणेबाबत...

. मा. सारिका सस्ते मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

. ---------

दि.०८/१०/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१४) चा सभावृतांत कायम करण्यात आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्र. ५९ विषय क्र.०१

दि.१८/१०/२०२१

सुचक - मा. प्रियांका बारसे अनुमोदक - मा.सारिका सस्ते

संदर्भ- मा. प्रियांका बारसे व मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांच्या शिक्षणात सातत्य राहावे यासाठी महानगरपालिका शाळेतील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे स्वाध्याय पुस्तिका वितरीत करण्यात याव्यात या पुस्तिकेच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडथळे बऱ्याच प्रमाणात दूर होऊन ते शिक्षणाच्या प्रवाहात राहतील असे शिक्षण समितीस वाटते. तसेच लिखाण कामाला त्यांना प्रेरणा मिळेल. ऑनलाईन शिक्षणामुळे त्यांचे लेखी काम कमी झाले असून लेखनाचा सराव असणे महत्त्वाचे आहे त्या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांना स्वाध्याय पुस्तिका व वहया वितरीत करण्यास तसेच शिक्षक कर्मचाऱ्यांशी चर्चा करताना शिक्षण समिती सदस्यास असे लक्षात आले की, आपल्याकडे फक्त मराठी माध्यमाच्या स्वाध्याय पुस्तिका आपण वाटप करतो.सेमी इंग्रजी माध्यम आपल्याकडे चालू आहे पण त्याच्या स्वाध्याय पुस्तिका विद्यार्थ्यांना मिळत नाही तर यावेळी सेमी इंग्रजीच्या गणित आणि विज्ञानाच्या सुद्धा स्वाध्याय पुस्तिका विद्यार्थ्यांपर्यंत जातील अशी व्यवस्था करण्यात यावी सबब विषयास मान्यता देणेत येत आहे सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

------------------

ठराव क्र. ६० विषय क्र.०२

दि.१८/१०/२०२१

सुचक - मा. सारिका सस्ते अनुमोदक - मा.स्वाती काटे

संदर्भ- मा. सारिका सस्ते व मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषगाने विद्यार्थांच्या कला गुणांना वाव देण्याचे कामकाज शिक्षण समिती करण्याचे दृष्टीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ. १ ली ते इ. १० वी तील विद्यार्थांना स्पंदन म्युझिक अँड डान्स अकॅडमिक संस्थेमार्फत संगीत आणि नृत्य प्रशिक्षण देणेकामी

सदर संस्थेमार्फत शिक्षण समितीस प्रस्ताव प्राप्त झाला असून विद्यार्थांना अशा प्रकारचे शिक्षण घेण्याकरिता मोठया प्रमाणात आर्थिक ताण येत असल्याने मनपाच्या विद्यार्थांना तेच शिक्षण मोफत देण्याचा मानस आहे. सदर प्रशिक्षणाकरिता प्रति विद्यार्थी ३००/- प्रमाणे येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यतेसाठी मा.स्थायी समिकडे शिफारस करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

------------------------

ठराव क्र. ६१ विषय क्र.०३

दि.१८/१०/२०२१

सुचक - मा. सारिका सस्ते अनुमोदक - मा. प्रियांका बारसे

संदर्भ- मा. सारिका सस्ते व मा.प्रियांका बारसे यांचा प्रस्ताव

सध्याच्या काळात अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांच्या अवांतर मराठी वाचनाचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे विविध अहवाल व सर्वेक्षणांवरून निदर्शनास आले आहे. टीव्ही, मोबाईल व इंटरनेटचा वाढता प्रभाव हे त्यापैकी प्रमुख कारण मानण्यात येत आहे. त्यातही मराठी साहित्याचे भूषण मानले जाणारे संत साहित्यातील ग्रंथ तसेच स्वामी विवेकानंद, सावरकर, गांधीजी, आंबेडकर इत्यादि महत्त्वाच्या महापुरुषांचे मूळ लेखन नवीन पिढीच्या वाचनात असण्याची शक्यताही निर्माण होताना दिसत नाही. यावर एक परिणामकारक उपाय म्हणून पन्नालाल म्युझिक कंपनीच्या 'पुस्तकवाणी' या ऑडिओबुक्स प्रकाशित करणा-या प्रकाशनातर्फे पुढाकार घेत या शालेय सांस्कृतिक उपक्रमाची आखणी करण्यात आली आहे. हा उपक्रम विद्यार्थी तसेच शिक्षक व पालकांच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे.शालेय विद्यार्थ्यांसाठी निवडक १३५ चरित्रांची 'थोरांची ओळख | राष्ट्रीय चरित्रमाला' ही प्रत्येकी ४० मिनिटांची 'लेक्चर

सीरीज' आणि 'शालेय मूल्यसंस्कार श्रवण महासंच' हा एकूण ७० विस्तृत ऑडिओबुक्स असा एकूण २०५ ऑडिओबुक्सचा हा प्रस्तावित संच शाळांच्या डिजिटल लायब्ररीसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

या संचात समाविष्ट ऑडिओबुक्सची निवड चरित्र, चारित्र्य, आणि व्यक्तिमत्त्व विकास या त्रिसूत्रीनुरूप करण्यात आली आहे. महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वांचा व त्यांच्या कार्याचा गोष्टीरूप परिचय करून देणा-या गोष्टी, संत-साहित्य, नीतिकथा, महापुरूषांचे जीवन-विचार दर्शन इत्यादि विद्यार्थ्यांची चारित्र्य उन्नती घडवतील असे विषय; तसेच आत्ताच्या स्पर्धात्मक युगात प्रत्येकासाठी अनिवार्य असणारे व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे; तसेच मूलभूत नीती, इतिहास, तत्त्वज्ञान, कला व कायदा यांचा परिचय, असे या संचाचे स्वरूप आहे. यातील काही ग्रंथ विशेषतः शालेय शिक्षकांसाठी समाविष्ट करण्यात आले आहेत. सर्व समाविष्ट ऑडिओ पुस्तकांची नावे व तपशील सोबत देत आहोत.प्रकल्पाची भूमिका :-

- शालेय मुलांना मराठी भाषेची, आपल्या भारतीय संस्कृतीची गोडी लागावी आणि त्यांच्यावर उत्तम मूल्यसंस्कार व्हावेत यासाठी ओवी, श्लोक, अभंग, चरित्रगोष्टी, नीतीकथा तसेच गोष्टीरूप इतिहास हे माध्यम अत्यंत प्रभावी असते.
- मात्र आजच्या टीव्ही, मोबाईल, इंटरनेटच्या युगात मुलांना क्रमिक अभ्यासक्रमासोबत हे सर्व वाचायला लावणे हे अत्यंत कठीण झाले आहे.
- त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरी, संत साहित्य तसेच भगवद्गीता यांसारखे विषय शालेय मुलांना सोप्या रीतीने व प्रभावीपणे कसे शिकवावेत, हा प्रश्न अनेक शिक्षक आणि पालकांना पडतो. शिक्षकांच्याही वाचनात मराठीतील अनेक महत्त्वाचे ग्रंथ आलेले नसतात.
- परंतु, 'जे जे वाचणे अवघड, ते ते ऐकणे सोपे!' ऐकण्याचे माध्यम हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. यासाठी शालेय परिपाठात महत्वाच्या अवांतर विषयांच्या सामुहिक श्रवणाचा समावेश करणे अत्यंत उपयुत ठरेल.म्हणूनच या संचामध्ये -मूल्यविकास : (संत साहित्य, बोधकथा, थोरांचे उपदेश), चरित्र विकास : (निवडक थोरांच्या चरित्रगोष्टी आणि चरित्र अभ्यास),

चारित्र्य विकास : (थोर व्यक्तीनी केलेले व्यक्तिमत्त्व विकास आणि इतर जीवनविषयक मार्गदर्शन)
नीती, तत्त्वज्ञान, कला व कायदा : (नीतीकथा, विचारांची शाळा, संगीतशास्त्र, सुबोध संविधान)
या सूत्रांमध्ये एकूण २०५ निवडक विशेष श्राव्यपुस्तके (ऑडिओबुक्स) समाविष्ट केली आहेत.

- शालेय दिनक्रमात आठवड्यातून दोन दिवस चाळीस मिनिटांचा 'ऐकण्याचा तास' नियोजित करून त्यामध्ये किंवा रोज मधल्या सुट्टीमध्ये १५ मिनिटे वर्षभर शाळेच्या स्पीकर सिस्टम वरुन ही पुस्तके टप्प्याटप्प्याने ऐकवली तर सहजपणे उत्तम मराठी भाषा आणि मूल्यसंस्कार मुलांमध्ये रुजवणे शक्य होईल. शाळेतील मुख्याध्यापक आणि शिक्षक यांनी पुढाकार घेऊन जरूर हा प्रयोग केल्यास यातून निश्चितच सकारात्मक परिणाम घडवता येईल.
- यामध्ये प्रत्येक ग्रंथ प्रकरण स्वरूपात सादर केला आहे. त्यामुळे रोज १०-१५ मिनिटे किंवा अर्धा-पाऊण तास ऐकवल्यास टप्प्याटप्प्याने हे सर्व महत्वाचे विषय सहजपणे मुलांपर्यंत पोहोचवता येऊ शकतील. तसेच शिक्षकांचेही ऐकून होतील.या शालेय श्रवण महासंचाचे स्वरूप व मूल्य :-

  SET - A 'ऐकण्याचा तास' | थोरांची ओळख | राष्ट्रीय चरित्रमाला : शालेय 'लेक्चर सीरीज'

  एकूण ऑडिओ पुस्तके : १३५ Format : A Set of 13 USB Cards / 135 Mp3 Audio Discs

प्रत्येकी कालावधी : पाऊण तास प्रत्येकी मूल्य : रुपये २९९/- (अक्षरी रुपये दोनशे नव्याण्णव फक्त) SET - A चे एकूण मूल्य : रुपये ४०,३६५/- (अक्षरी रुपये चाळीस हजार तीनशे पासष्ट फक्त) SET – B 'शालेय मूल्यसंस्कार श्रवण महासंच' : चरित्र, चारित्र्य, नीती, तत्त्वज्ञान, इतिहास, कला व कायदा एकूण ऑडिओ पुस्तके : ७० Format : A Set of 7 USB Cards / 135 Mp3 Audio Discs प्रत्येकी कालावधी : दोन ते पाच तास प्रत्येकी मूल्य : रुपये ४९५/- (अक्षरी रुपये चारशे पंचाण्णव फक्त) SET - B चे एकूण मूल्य : रुपये ३४,६५०/- (अक्षरी रुपये चौतीस हजार सहाशे पन्नास फक्त) SET - A आणि SET - B चे एकत्रित मूल्य प्रति शाळा : ७५,०१५/- (अक्षरी रुपये पंचाहत्तर हजार पंधरा फक्त)

तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील शाळेतील इ. १ ली ते इ. ८ वी तील विद्यार्थांसाठी पन्नालाल म्युझिक कंपनीच्या 'पुस्तकवाणी' यांच्यामार्फत मनपाच्या प्रति शाळा डिजिटल लायब्ररीसाठी लागणारे २०५ ऑडिओबुक्सचा खरेदी करण्यात यावे. सदरच्या उपक्रमास र.रु. ८२,५१,६५०/- येणा-या अपेक्षित खर्चास् अथवा प्रत्यक्ष खर्चास मान्यतेसाठी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

-------------

ठराव क्र. ६२ विषय क्र.०४

दि.१८/१०/२०२१

सुचक - मा. सारिका सस्ते अनुमोदक - मा. मनिषा पवार

संदर्भ- मा. सारिका सस्ते व मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थांना मोफत शालेय साहित्य वाटप करण्यात येते. परंतु मागील शैक्षणिक वर्षी करोना रोगाचा प्रादुर्भाव असल्याने शासन आदेशानुसार शाळा बंद होत्या. सद्यस्थितीमध्ये कोरोना रोगाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने शासनाने शाळा सुरु करण्याचे संकेत दिलेले आहेत. मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थांना मोफत शालेय दफ्तरे दिली गेली नसल्याने व राज्य शासनाच्या आदेशानुसार शाळा सुरु होत असताना सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षाकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विभागातील इयत्ता १ ली ते इ.१० वी च्या विद्यार्थांकरिता शालेय दफ्तरे खरेदी करण्यात

येऊन विद्यार्थांना वाटप करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५३२/२०२१
दिनांक : २१/१०/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.